नियं. फौ.खटला क्र. १०४/२०२४

सरकार – वि. – विनोद तुमळाम

नि.क्र. १४

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२**

**मी शपथेवर खरे सांगतो की,**

**नाव – दुधराम बळीराम सयाम ,**

**वय –** ५३ वर्ष, **कामधंदा** – शेती ,

**राह**. पिंपळगाव कोहळी, ता. लाखांदुर, जिल्हा भंडारा.

**सरतपास– श्रीमती एस. व्ही. भेंडारकर सरकारी वकील यांचेमार्फत–**

१. मी आरोपीला ओळखतो. दि. २७.८.२०२४ रोजी घटना दुपारी दीड ते दोन वाजेच्या दरम्यान माझ्या घरी घडली होती. आरोपी हा माझ्या मुलीला आधार कार्ड दया असे बोलत होते. त्यानंतर मी ग्रामपंचायत मध्ये गेलो. त्यानंतर माझ्या मुलीमध्ये व आरोपीमध्ये भांडण झाले. त्यानंतर माझी पत्नी ग्रामपंचायत मध्ये आली आणि मला सांगीतले की आरोपी आधार कार्डची मागणी करत आहे. त्यानंतर मी ग्रामपंचायत मधुन घरी आलो. मी घरी आल्यानंतर आरोपीला समजविण्याचा प्रयत्न केला परंतु तो समजत नव्हता व नंतर आरोपीने माझ्या हनुवटीवर चावा घेतला. त्यामुळे माझ्या रक्त निघत होता. त्यानंतर मी ग्रामीण रुग्णालय लाखांदुर येथे गेलो.

२. त्यांनतर मला डॉक्टरांनी विचारले की, तुम्ही पोलीस स्टेशनला गेले नाही काय ?त्यानंतर तेथे पोलीस स्टेशनचे दोन तीन कर्मचारी आले. त्यानंतर मी त्यांना घटना झाल्याचे सांगीतले. पोलीसांनी माझे बयाण दवाखान्यात घेतले होते. आता मला माझे बयाण दाखवण्यात आले. त्यावर माझी सही आहे, त्यामध्ये लिहीलेला मजकुर खरा व बरोबर आहे, त्यास **नि. क्र. १५** देण्यात येत आहे. त्यानंतर पोलीस माझी विचारपुस घरी येवून देखील केली होती. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**उलटतपास आरोपीचे वकिल श्री. व्ही. पी. खोब्रागडे यांचे मार्फत–**

३. माझी मुलगी म्हणजेच आरोपीची पत्नी आरोपीच्याच घरी राहते. माझ्या मुलीला एक मुलगा व एक मुलगी आहे. घटनेच्या वेळी आरोपी व माझी मुलगी आमच्याच घरी राहत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलीचे आणि आरोपीचे पटत नसल्यामुळे माझी मुलगी माझ्याच घरी राहत होती. हे म्हणणे खरे नाही की, माझे जावई माझ्या मुलीला घ्यायला

यायचे परंतु मी माझ्या मुलीला पाठवत नव्हतो. मी ग्रामपंचायत मध्ये तक्रार देण्यासाठी गेलो नव्हतो. माझ्या मुलीचा लग्न आरोपीसोबत २०–२५ वर्षापुर्वी झाला असेल. माझ्या मुलीचा मोठा मुलगा १० वीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे जावई माझ्या मुलीला घ्यायला आले असता मी त्याना म्हणत असे की, उठले सुठले की तुम्ही माझ्या मुलीला घ्यायलाच येता.

४. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या अंगणात दगड ढोंडे व विटा आहेत. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी मी अंगणात पडलो. माझे १२ महीन्यापासुन जावयासोबत जाणेयेणे व बोलचाल बंद आहे. माझे जावई मुलीला घ्यायला आले नाही परंतु माझी मुलगी व नातु स्वतःहून जावयाच्या घरी गेली. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी काय लिहून घेतले हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, १२:३० ते १:०० च्या दरम्यान कोणतीच घटना घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मला माझ्या जावयाचा स्वभाव पटत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला चावले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. मी अजुनही जावयाच्या घरी जात नाही.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by PRAVIN PRABHULAL YADAV
Date: 2025.08.12 16:38:18 +0530

(प्रविण पी. यादव)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लाखांदुर.

लाखांदुर.
दिनांकः १२/०८/२०२५